## Dahisar to Dahanukar Wadi Metro-2A and Dahisar to Aarey Metro-7 corridors resume public service 20 kilometers

### Chief Minister Uddhav Thackeray flags off two Metro Lines for Mumbaikars

**Mumbai, April, 2, 2022 –** Shri. Uddhav Thackeray, Chief Minister of Maharashtra State, flagged off first phase of both Dahisar to Dahanukar Wadi Metro-2A and Dahisar to Aarey Metro-7, today. He congratulated MMRDA officials for overcoming many obstacles to create the additional Metro infrastructure.

Shri. Ajit Pawar, Deputy Chief Minister of Maharashtra, appealed to Mumbaikars to maintain the beauty of the new technology and infrastructure.

The Urban Development Minister Shri. Eknath Shinde said that the new metro corridors will provide a great relief to Mumbaikars travelling on the Western Express Highway and Dahisar to Dahanukar Wadi road.

Shri. Aditya Thackeray, Environment and Tourism and Suburban Guardian Minister also extended his courtesy to MMRDA officials for completing the 20-km long Metro corridors despite Covid slowing the progress of the city.

The Chief Minister and other dignitaries bought tickets. He visited the Station Control Room and had video interaction with the staff in the Operation Control Centre. On the occasion, the Time-Table for the new corridors was also released at the hands of the Chief Minister. Shri. Uddhav Thackeray also felicitated MMRDA Officials, Contractors and workers for their valued contribution to bringing the first phase of this corridor to Mumbaikars.

The MMRDA will deploy ten metro trains daily in service on this 20-km long route. The comfortable and safe journey can be enjoyed with a minimum fare of Rs.10 and a maximum of Rs.40. While the trains will run with pilots at the helm initially, the latest technology has been used in form of CBTC system, signalling and driverless operations. The commuters can use the trains from 8 pm today. Tomorrow onwards the services will run from 6 am to 10 pm on a daily basis.

The stations on the route will make commuters' life easier with facilities such as drinking water, toilets and more importantly the tactile pathway – designed with international standards – which will help visually impaired commuters find their way without much inconvenience. The wheel-chaired commuters will also comfortably ride the metro in the first and the last coach.

All stations are equipped with CCTV surveillance, security personnel and fire extinguishers. Besides, the latest fare collection technology with paper QR Ticket, Mobile QR Ticket facility will also ease commuters' journey - 18 stations in all.

Dahisar to Dahanukar Wadi Metro-2A

Stations – Dahisar, Anand Nagar, Kandarpada, Mandapeshwar-IC Colony, Eksar, Borivali (West), Pahadi Eksar, Kandivali (West) and Dahanukar Wadi

Dahisar to Aarey Metro-7

Stations – Aarey, Dindoshi, Kurar, Akurli, Poisar, Magathane, Devipada, Rashtriya Udyan, Ovari Pada.

## दहिसर ते डहाणूकरवाडी मेट्रो-२अ आणि दहिसर ते आरे मेट्रो-७ मार्ग मुंबईच्या सेवेत

## मुंबईकरांसाठी दोन मेट्रो मार्गांना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दाखवला हिरवा कंदील

**मुंबई, २एप्रिल, २०२२ –**महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, श्री. उद्धव ठाकरे, यांनी आज दहिसर ते डहाणूकरवाडी मेट्रो-२अ आणि दहिसर ते आरे मेट्रो-७ या दोन्ही प्रकल्पांच्या पहिल्या टप्प्यांना हिरवा कंदील दाखवला. विविध अडचणींवर मात करून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनीही सुविधा उपलब्ध केल्याबद्दल त्यांचे आभारही मुख्यमंत्र्यांनी मानले.

अद्ययावत आणि सुंदर अशा मेट्रोला मुंबईकरांनी जपावं, त्याची नासधूस करू नये असं आवाहनही महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी या प्रसंगी केलं.

नव्या मेट्रोमार्गांमुळे पश्चिम द्रुतगतीमार्ग आणि दहिसर ते डहाणूकरवाडी मार्गावरील वाहतूक कोंडीवर नियंत्रण राखता येईल असं नगरविकास मंत्री श्री. एकनाथ शिंदे म्हणाले.

पर्यावरण आणि पर्यटन तसेच उपनगरांचे पालकमंत्री श्री. आदित्य ठाकरे यांनीही प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना कोव्हीडमुळे निर्माण झालेल्या परिस्थीवर  मात करून हे मेट्रो मार्ग पूर्ण केल्याबद्दल धन्यवाद दिले.

मेट्रो मधून कुरार पर्यंत प्रवास करण्यापूर्वी मुख्यमंत्री आणि इतर माननीय निमंत्रितांनी तिकिटं विकत घेतली, स्टेशन कंट्रोल सेंटरला भेट दिली आणि ऑपेरेशन कंट्रोल सेंटर मधील कर्मचाऱ्यांशी व्हिडिओच्या माध्यमातून चर्चा केली. या प्रसंगी नवीन मेट्रो मार्गांच्या वेळापत्रकाचेही प्रकाशन मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आलं. तसेच, प्राधिकरणाचे अधिकारी, कंत्राटदार आणि कर्मचारीयांना त्यांच्या महत्वपूर्ण कामगिरीसाठी आणि या दोन मेट्रोमार्गांच्या पहिल्या टप्प्याला मुंबईकरांसाठी पूर्ण करण्याबद्दल गौरवण्यात आलं.

२०-कि.मी.लांबीच्या या मेट्रोमार्गावर मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणातर्फे १० ट्रेन्स चालवण्यात येणार आहेत. अद्ययावत अशा या ट्रेनमधून प्रवास करण्यासाठी कमीत कमी १० आणि जास्तीत जास्त ४० रुपये भाडं आकारण्यात येणार आहे. सुरुवातीला जरी या ट्रेन्स चालवण्यासाठी चालकांचा उपयोग करण्यात येणार असला तरी, नजीकच्या भविष्यात या अद्ययावत ट्रेन्स चालकाविना धावणार आहेत. या दोन्ही मार्गांवर आज रात्री आठ पासून प्रवास सुरु झालेला असून, ठरल्याप्रमाणे ३ एप्रिल पासून या मार्गांवर रोज सकाळी सहा ते रात्री दहा पर्यंत प्रवास करता येणार आहे - एकूण 18 स्थानके.

पिण्याचं पाणी, स्वच्छतागृहं अशा सुविधां सहस्थानकांवर अंध प्रवाशांसाठीआंतरराष्ट्रीय दर्जाची पथदर्शक सुविधा सुद्धा उपलब्ध आहे. यामुळे अंधप्रवाशांना स्थानकांवर ये-जा करणं सोयीचं होणार आहे. तसेच, मेट्रोट्रेनच्या पहिल्या आणि शेवटच्या कोचमध्ये व्हीलचेअरवरून  प्रवास करणाऱ्यांसाठी सुविधा उपलब्ध असणारआहे.

ट्रेनमध्ये उपलब्ध असणाऱ्या सुविधांमध्ये सी सी टीव्ही कॅमेरे, सुरक्षा कर्मी आणि अग्निशामक यंत्रांचाही समावेश आहे. याशिवाय, स्थानकांवर तिकिटं देणारी अद्ययावत यंत्रणा आहे. त्यात कागदी आणि मोबाइलला क्यू आर कोड पद्धतीनेही तिकिटं उपलब्ध करण्याची सोय आहे.

दहिसर ते डहाणूकरवाडी मेट्रो-२ अ मार्गावरील स्थानकं -

दहिसर, आनंदनगर, कादरपाडा, मंडपेश्वर-आय.सी. कॉलनी, एक्सर, बोरिवली (पश्चिम), पहाडीएक्सर, कांदिवली (पश्चिम) आणि डहाणूकरवाडी

दहिसर ते आरे मेट्रो-७ मार्गावरील स्थानकं -

आरे, दिंडोशी, कुरार, आकुर्ली, पोईसर, मागाठणे, देवीपाडा, राष्ट्रीयउद्यान, ओव्हरीपाडा, दहिसर





